## दैनिक सकाळच्या बुधवार, दि. १३ जून, १९८४ च्या अंकात प्रसिद्ध झालेला लेख

# माणसे घडविण्याचा उपक्रम - 'स्व'-रूपवर्धिनी

सत्यरंजन साठे

पूर्व पुण्यातील गरिबीत जीवन जगणाऱ्या कुटुंबातील मुलाना शाळेव्यतिरिक्त विशेष शिक्षण देण्याचा व त्यांच्यावर बौद्धिक तसेच सांस्कृतिक शैक्षणिक संस्कार करण्याचा उपक्रम श्री. पटवर्धन व त्यांच्या सारखेच इतर तळमळीने काम करणारे स्वयंसेवक करत असतात व त्यांची संस्था 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने ओळखली जाते. 'स्व'-रूपवर्धिनीच्या मुलांचे उन्हाळी सुट्टीतील एक शिबिर लॉ कॉलेजच्या परिसरात व्हावे, अशी श्री. पटवर्धन यांची इच्छा होती. लॉ कॉलेजचे वसतिगृहातल्या काही खोल्या मुलांना राहाण्यास व कॉलेजचे पटांगण, पोहण्याचा तलाव यांचा उपयोग करू देण्यास परवानगी हवी होती. 'स्व'-रूपवर्धिनी च्या शिबिरास परवानगी देण्यासाठी मी इंडियन लॉ सोसायटी च्या संचालक मंडळास शिफारस केली व तशी परवानगी मिळाली. गेली दोन वर्ष 'स्व'-रूपवर्धिनीची उन्हाळी शिबिरे लॉ कॉलेजच्या आवारात झाली व तिने प्रत्यक्षात चालविलेल्या एका माणूस घडविण्याच्या चळवळीचा प्रत्यय आला.

आज निराशामय वातम्यांनी मन सारखेच कचण्याचा अनुभव अनेकांना येतो. भ्रष्टाचार, चारित्र्यहीनता, संधीसाधूपणा म्हणजेच व्यवहारीपण असे समीकरणही लोक मांडतात. व मोठ्या शिताफीने ह्या गोष्टींना प्रतिष्ठा देऊ पाहातात. अशा वेळी या अंधारातही 'स्व'-रूपवर्धिनीसारख्या काही पणत्या मिणमिणताना दिसल्यावर मनाला निश्चितच आधार वाटतो. बाबा आमटे यांच्यासारखे कर्मयोगी फार मोठ्या प्रमाणावर 'माणूस' बनविण्याचे व घडविण्याचे कार्य करीत असतात. त्याच बरोबर अनेक छोटे छोटे गट परिवर्तनाच्या बाजूने तयार होत आहेत. कार्य करीत आहेत. हा देखील अनुभव येतोच. अशा गटांशी संबंध येण्याची संध ीही मला मिळते. याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो. 'स्व'-रूपवर्धिनीच्या मर्यादा मान्य करून देखील तिने जी चळवळ हाती घेतली आहे ती निःसंशय महत्त्वाची आहे.

श्री. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन जानेवारी १९७९ मध्ये रास्ता पेठ मधील आर. डी. हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाले. आपल्या दीर्घ शिक्षकीय जीवनातील अनुभवातून त्यांना 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाची प्रेरणा मिळाली. शैक्षणिक संधी आर्थिक परिस्थितीमुळे तसेच सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणामुळे नाकारली गेल्यामुळे जीवनात मागे पडणारी मुले त्यांनी पाहिली होती. मागासलेल्यांना विशेष संधी देण्यासाठी जशा राखीव जागा देणे आवश्यक असते किंवा इतर फी माफी किंवा आर्थिक साहाय्य आवश्यक असते, तितकेच किंवा त्याहून अधिक प्रमाणांत त्या विद्यार्थ्यास आत्मविश्वास देणे, सामाजिक विषमतेमुळे व्यक्तिगत विकासांच्या ज्या सोयी सुविधा नाकारल्या गेल्या त्या मिळवून देणे आवश्यक असते. 'स्व'-रूपवर्धिनी हेच करते.

पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतून व इतर काही शाळांमधील निवडलेली मुले 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये येतात. आज शाळां- मधून ज्या गोष्टींकडे लक्ष दिले जात नाही किंवा दिले जाऊ शकत नाही, अशा आवश्यक विषयांचे शिक्षण देण्याचा एक छोटासा प्रयत्न 'स्व'-रूपवर्धिनी गेली पाच वर्षं करीत आहे. सामाजिक आशय असलेले ध्येयलक्षी शिक्षण ही ह्यातील एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. अभ्यासाच्या विषयांव्यतिरिक्त अन्य विषय विद्यार्थ्यांसमोर ठेवले जातात. १३ मे १९७९ रोजी बारा विद्यार्थ्यांना बुद्धिमापन कसोटी

देऊन निवडले व प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. आज वर्धिनीतील ५ वी ते १० वी मधील वर्धक विद्यार्थ्यांची संख्या १०० आहे. पुण्याच्या पूर्व भागातील महात्मा फुले यांच्या कर्मभूमीतील कामगार बंधूंच्या हुशार मुलांना एकत्र करून त्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करण्याचा हा प्रयत्न निश्चितच स्तुत्य आहे.

मार्च १९८३ च्या १० वीच्या परीक्षेस वर्धिनीची पहिली तुकडी बसली. नियमित १२ विद्यार्थ्यांपैकी ८ विद्यार्थ्यांना ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले. सर्वात अधिक गुण ८९ टक्के होते. पण माझ्यासारखेच इतरांनाही ते मिळायला हवे या ध्येयाने प्रेरित होऊन १० वी च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी अनेक विद्यार्थी वर्धिनीचे काम पुढे चालविण्यास मदत करीत आहेत. रवींद्र मेदळे, विश्वास कुलकर्णी, मनोहर सोनवणे या विद्यार्थ्यांनी अभ्यास वर्गाची जबाबदारी घेतली असून, ते विद्यार्थी संध्याकाळी जवळच्या गरीब वस्त्यांमध्ये जाऊन नियमितपणे अभ्यासवर्ग चालवितात. संजय तांबट, किशोर सोंडूर, सुनील भरतीया, राजेंद्र नरवडे, जयप्रकाश नायर हे वर्धिनीच्या दैनंदिन कामात लक्ष घालत आहेत. लातूर येथे अभियांत्रिकी शिक्षणासाठी गेलेला प्रमोद भंडारी याने नुकताच लातूर येथे ६० विद्यार्थ्यांचा संस्कार वर्ग चालू केला आहे. याचा अर्थ असा की 'स्व'-रूपवर्धिनीचे विद्यार्थी केवळ परीक्षेतील यशच मिळवितात असे नाही, तर ते खऱ्या अर्थाने सुशिक्षित बनतात व सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत सहभागी होतात.

'स्व'-रूपवर्धिनीच्या पालकांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन हा संबंध व्यक्तिमत्त्व बनविण्याच्या ध्येयातून साकारला असल्याने वर्धिनीत शिकविण्यात येणाऱ्या विविध विषयांवरून चटकन ध्यानात येईल.

नागरिकत्व म्हणजे काय? जीवनाचे उद्दिष्ट काय असावे? यासारखे गंभीर विषय आहेत तसेच सौ. सरिता पत्की व श्रीमती पद्मा गोळे यांचासारख्या कवित्रीच्या कविता वाचनाचाही समावेश असतो. आजच्या शिक्षणातला एकसुरीपणा व फक्त मार्क मिळवणे हे ध्येय चांगल्या व्यक्तिमत्त्वाला मारक आहे व त्याची खूप मोठी किंमत आपल्या मध्यम व उच्च वर्गियांना द्यावी लागणार आहे. 'स्व'-रूपवर्धिनीने याही बाबतीत सुधारलेले पाऊल टाकले आहे. मुलांबरोबरच त्यांच्या पालकांनाही काही वेळेस शिबिराच्या समारंभात व पालक सभांना बोलविण्यात येते व त्यामुळे त्यांच्याशीही जवळीक साधली जाते.

येथे येणारे सर्व विद्यार्थी हे कोणत्या ना कोणत्या शाळेमध्ये जातात व आपापल्या शाळा सुटल्यावर संध्याकाळी ६.१५ वाजता एकत्र येतात. दिवसभरातील शाळेतील तासांचा, अभ्यासाचा शीण घालविण्याकरता एक तास खेळ होतात. येथे येणाऱ्या कितीतरी मुलांच्या घरासमोर खेळायला मोकळी जागा नाही. वाऱ्याला देखील शिरायला जागा नसावी अशा दाट वस्तीतल्या मुलांना खेळायला मोकळी जागा कुठून मिळणार? खेळ खेळून तासाभरात ती मुले ताजी तवानी होतात. व मग त्यांच्या अभ्यासाला सुरुवात होते.

वर्धिनीत येणाऱ्या विद्यार्थ्यांकडून केवळ ५० पैसे दरमहा फी घेतली जाते. वर्षात दोन शिबिरे होतात. या शिबिराचा खर्च प्रत्येक मुलामागे ८० ते १०० रु. पर्यंत होतो. तरीही वर्धिनीची फी ऐच्छिकच असते. प्रत्येक आठवड्याला दोनदा पूरक आहार पुरविला जातो. आवश्यक तेव्हा वैद्यकीय सेवाही पुरविली जाते. वर्धिनीला आज संचालक मंडळातील सदस्यांकडून आर्थिक मदत मिळते. काही हितचिंतक स्नेही हेही मदतीचा हात पुढे करतात. पण संस्था जशी वाढते तसेच खर्चाचे प्रमाणही वाढणारच. संस्था आपली स्वतःची इमारत बांधू शकते. व त्याकरता जागाही विकत घेतली आहे. संस्थेत काम करण्यास निष्ठावंत शिक्षकांचे सहकार्य मिळते आहे. शिरीष रामचंद्र पटवर्धन यांनी आपली १६०० रुपये पगाराची नोकरी सोडली, व वर्धिनीच्या कामास वाहून घेतले तसेच रामकृष्ण परशूराम देसाई यांनी स्वेच्छेने आपल्या नोकरीतून सेवानिवृत्ती स्वीकारली व वर्धिनीच्या कार्यासाठी स्वतःचा संपूर्ण वेळ दिला.

या पुढच्या योजनांमध्ये 'स्व'- रूपवर्धिनीची दोन वेळची शाळा, मुलांसाठी व्यायामशाळा, वाचनालय, अभ्यासिका, खेळांचा संग्रह, व्यसनमुक्ती आंदोलन इ. चा समावेश आहे. या सर्व योजनेला जनतेचे सहकार्य अपेक्षित आहे.

❊ ❊ ❊